दुरध्वनी- ०२०-२६३६०९४१

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
२८, क्वीन्स गार्डन, जुने सर्किट हाऊस जवळ,
पुणे-४११००१

महाराष्ट्र शासन

E-mail:trti.mah@nic.in
Website: trti.maharashtra.gov.in

---

जा.क्र. आसंप्रसं/२०२४-२५/स्पर्धा परीक्षा/का- ४/ २६४० दिनांक : ०६/११/२०२४

## महत्त्वाची सूचना

**स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम २०२४-२५ अंतर्गत पोलीस/सैन्य या पदांच्या भरतीसाठी स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम (अनिवासी) योजनेसाठी उमेदवारांना प्रशिक्षण संस्था निवडीबाबतची विकल्प लिंक उपलब्ध करून देणेबाबत**

"स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम २०२४-२५" अंतर्गत आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांचेमार्फत राबविल्या जाणाऱ्या **पोलीस/सैन्य दलातील पदांच्या भरतीसाठी स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम (अनिवासी) योजनेसाठी प्राप्त झालेल्या अर्जांना अनुसरून उमेदवारांच्या इयत्ता दहावीच्या प्राप्त टक्केवारीनुसार व जिल्हा निहाय लाभार्थी लक्षांकानुसार (प्रति TSP जिल्हा - १००० लाभार्थी व प्रति Non-TSP जिल्हा -३५० लाभार्थी याप्रमाणे व २०% प्रति जिल्हा अधिकचे उमेदवार यांना) अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना** संबंधित प्रशिक्षण देणाऱ्या खाजगी नामांकित प्रशिक्षण संस्थेची निवड करण्यासाठी विकल्प देण्याची सुविधा खालील लिंकवरून उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**विकल्प सुविधा लिंक: https://cpetp.trti-maha.in/**

**सदर ऑनलाइन विकल्प देण्याची लिंक आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या संकेतस्थळावरून दि.०७.११.२०२४ रोजी रा. १०.०० वाजेपासून ते दि.१७.११.२०२४ रोजी रात्री ११:५९ वाजेपर्यंत या कालावधीकरिता उपलब्ध करून देण्यात येत आहे. सदर लिंक उपरोक्त नमूद कालावधी पर्यंतच चालू राहील व त्यास कोणत्याही प्रकारची मुदतवाढ देण्यात येणार नाही याबाबत सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

**तसेच उपरोक्त नमूद कालावधीत उमेदवारांनी विकल्प सादर न केल्यास त्यांना पुन्हा कोणत्याही प्रकारे विकल्प सादर करता येणार नाहीत याची नोंद घ्यावी.**

**याव्यतिरिक्त ज्या उमेदवारांनी यापूर्वी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या १. इतर कोणत्याही स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण कार्यक्रमाचा/इतर योजनांचा लाभ घेतला असल्यास किंवा २. स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण कार्यक्रम २०२४ मधील MPSC, UPSC व इतर प्रशिक्षण योजनांपैकी कोणत्याही योजनेसाठी विकल्प सादर करून कागदपत्र पडताळणीसाठी निवड झाली असल्यास अशा उमेदवारांना "पोलीस/सैन्य या पदांच्या भरतीसाठी स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम (अनिवासी) योजने" साठी विकल्प सादर करता येणार नाही याची नोंद घ्यावी.**

पूर्व प्रशिक्षण संस्थेची निवड करण्याकरिता ऑनलाइन विकल्प देण्याची कार्यवाही करण्यापूर्वी उमेदवारांनी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या संकेतस्थळावर दि.२०.०९.२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या सूचना क्र. आसंप्रसं/२०२४-२५/स्पर्धा परीक्षा/का-४/२७५९ यांचे काळजीपूर्वक वाचन करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर पुढील सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

प्रत्येक स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमा अंतर्गत देय असलेले प्रशिक्षण शुल्क व प्रशिक्षणार्थींना देण्यात येणाऱ्या वैयक्तिक लाभाबाबतची सविस्तर माहिती (Stipend and any other payments as applicable) ही यापूर्वीच आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. उमेदवारांनी सर्व माहिती पडताळून त्यानंतरच विकल्प देण्याची कार्यवाही पूर्ण करावी.

पूर्व प्रशिक्षण संस्थेच्या निवडीकरिता ऑनलाइन विकल्प देण्यासाठी संबंधित लिंक वरून लॉगीन करणे आवश्यक आहे. **ज्या उमेदवारांना विकल्प देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असेल त्यांना याबाबत ईमेलद्वारे कळविण्यात येईल. विकल्प नोंदविण्याकरिता ईमेल प्राप्त झालेल्या सर्व संबंधित उमेदवारांनी प्रवेश अर्ज (Application Form) भरताना वापरलेल्या लॉगीन आयडी व पासवर्ड यांचा वापर करून लॉगीन करावे व विकल्प नोंदवावे. पासवर्ड विसरला असल्यास Forgot Password या सुविधेचा वापर करावा व आपल्या लॉगीन आयडी करिता नवीन पासवर्ड निश्चित करून घ्यावा.** उमेदवारांनी सदर ईमेल आयडी व मोबाईल क्रमांक हे संस्था निवड प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत चालू स्थितीत ठेवणे आवश्यक आहे.

**जर एखादा उमेदवार पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण व सैन्य (मिलिटरी/पॅरा मिलिटरी) भरती पूर्व प्रशिक्षण या दोन्हीच्या अर्हता पूर्ण करत असेल तर अशा उमेदवाराने आपल्या पसंतीनुसार केवळ एकाच योजनेची पोलीस अथवा सैन्य (मिलिटरी/पॅरा मिलिटरी) पूर्व प्रशिक्षण योजनेची निवड करणे आवश्यक आहे.ज्या योजनेची निवड उमेदवाराने केली असेल ती अंतिम मानण्यात येऊन त्या योजनेशी संबंधित जिल्हा निहाय नामनिर्देशित खाजगी नामांकित प्रशिक्षण संस्थांचे विकल्प देण्याची सुविधा उपलब्ध होईल.**

सदर प्रशिक्षण हे अनिवासी स्वरूपाचे असल्याने उमेदवाराला ज्या जिल्ह्यात प्रशिक्षण घ्यायचे आहे त्या जिल्ह्याची प्रथम निवड करायची आहे. त्या जिल्ह्यात संबंधित योजनेचे प्रशिक्षण देणाऱ्या जितक्या नामनिर्देशित संस्था नमूद आहेत त्या सर्वांना उमेदवारांनी पसंतीक्रम/विकल्प (Preference) द्यायचा आहे.

*उदाहरण: उमेदवार "अ" हा पोलीस व सैन्य (मिलिटरी/पॅरा मिलिटरी) पूर्व प्रशिक्षण या दोन्ही योजनांकरिता पात्र ठरत आहे. अशा वेळी उमेदवार "अ" ने प्रथम पोलीस व सैन्य (मिलिटरी/पॅरा मिलिटरी) पूर्व प्रशिक्षण या दोन योजनांपैकी एका योजनेची निवड करावी. उमेदवाराने पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमाची निवड केली असता पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण कार्यक्रमा अंतर्गत ज्या जिल्ह्यांमध्ये सदर प्रशिक्षण देणाऱ्या नामनिर्देशित संस्था उपलब्ध आहेत अशा जिल्ह्यांची यादी दिसून येईल. उमेदवाराला जर नाशिक या जिल्ह्यात प्रशिक्षण घ्यावयाचे असेल, तर अशा वेळी उमेदवाराने नाशिक जिल्ह्याची निवड करून save या tab वर क्लिक करावे. क्लिक केल्यानंतर उमेदवारास नाशिक जिल्ह्यात पोलीस भरती पूर्व प्रशिक्षणाकरिता नामनिर्देशित झालेल्या संस्थांची यादी उपलब्ध होईल. प्रत्येक प्रशिक्षण संस्थेचा तपशील त्या त्या संस्थेसमोरील "View Details" Tab मधून पाहता येईल. निवड केलेल्या जिल्ह्यात, म्हणजे सदर उदाहरणातील नाशिक जिल्ह्यात जर ०८ प्रशिक्षण संस्था नामनिर्देशित असतील तर उमेदवाराने त्या सर्व संस्थांना पसंतीक्रम/विकल्प देणे बंधनकारक राहील.*

सर्व संस्थांना पसंतीक्रम/विकल्प दिल्यानंतर ईमेल OTP व SMS OTP द्वारे सदर पसंतीक्रम/विकल्प सत्यापित (verify) केल्यानंतरच आपले पसंतीक्रम/विकल्प Submit करण्याचा Tab कार्यान्वित होईल. Submit वर click केले असता आपले पसंतीक्रम/विकल्प नोंद होऊन त्याची Acknowledgement Receipt (पोच पावती) तयार होईल. **ईमेल OTP व SMS OTP द्वारे जोपर्यंत आपण विकल्प सत्यापित (verify) करत नाही तोपर्यंत आपले विकल्प अंतिम होणार नाहीत.**

**सदर प्रमाणे उमेदवारामार्फत नोंदविलेले पसंतीक्रम/विकल्प हे अंतिम असून त्यात कोणताही बदल करता येणार नाही**. सबब उमेदवारांना सूचित करण्यात येते की त्यांनी प्रशिक्षण संस्थांचे विकल्प हे त्यांच्या संदर्भातील उपलब्ध माहिती View Details Tab मधून वाचून त्यानंतरच भरावे.

सदर विकल्प लिंक वर **Contact Us या Tab/शीर्षकाखाली** सर्व संबधित योजनांचे **योजनानिहाय संपर्क** Email ID दिले आहेत. **तसेच विकल्प लिंक वर लॉगीन केल्यानंतर Support या Tab/शीर्षकाखाली Raise A Ticket या सुविधेद्वारे आपली समस्या नोंदविण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे.** सर्व उमेदवारांना सूचित करण्यात येते की त्यांनी केवळ याच मार्गाने आपल्या समस्या नोंदवाव्या. इतर कोणत्याही Email तसेच संपर्क क्रमांकावर आपल्या तक्रारी अथवा समस्येची नोंद घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. त्याचबरोबर **उमेदवारांना काही अपरिहार्य कारणास्तव आपला Email ID किंवा Mobile Number बदलणे आवश्यक असेल तर तशी सोय त्यांना login केल्यानंतर दिसणाऱ्या Profile Section मध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे.**

संबंधित खाजगी नामनिर्देशित प्रशिक्षण संस्थांमधील उपलब्ध प्रशिक्षणार्थी संख्येनुसार व उमेदवारांच्या इयत्ता दहावीच्या परीक्षेतील गुणानुक्रमानुसार प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रवेश दिला जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. तसेच दि. २०/०९/२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या सूचना क्र. आसंप्रसं/२०२४-२५/स्पर्धा परीक्षा/का-४/२७५९ नुसार कागदपत्र पडताळणीअंतीच उमेदवारांचा सदर प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता प्रवेश अंतिम करण्यात येईल याचीही नोंद घ्यावी.

(चंचल पाटील)
**सहसंचालक**
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे